# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 07/11/2019 (गुरूवार)
## (सायंकाळ)

---

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 6 कि.मी. अंतरावरील मौजा ब्राम्हणी पुर्नवसन टर्निंग येथे दिनांक 05/11/2019 चे 19:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रामा गुंडेराव धांडे, वय 50 वर्ष, रा. परसोडी राजा, ता. कुही हे वेलतुर येथून काम आटोपून मोटरसायकलने मुकेश चिंतामन नागोसे यांचे सोबत गावाकडे परसाडी राजा येथे जात होते. दरम्यान ब्राम्हणी पूनर्वसनच्या समोर मंगेश जागेश्वर डंभारे हा त्याच्या मोटरसायकलसह रक्त बंबाळ अवस्थेत खाली पडलेला दिसला. फिर्यादीने याबाबत विचारणा केली असता एमएच– 49/9175 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपीने त्याचे वाहन रिफलेक्टर व इंडिकेटर न लावता रोडवर उभे ठेवले. त्यामुळे मंगेश डंभारेचे मोटरसायकल आरोपीच्या ट्रकला मागुन धडकले. या अपघातात मोटरसायकल चालक मंगेश डंभारे यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 201, 184, 122, 134(अ), 134(ब) मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ यादवराव कुमरे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर